अमरावती विभागातील विभागीय आयुक्त व जिल्हा स्तरावरील पुनर्वसन व भूसंपादन आस्थापनेवरील निर्माण करण्यात आलेल्या एकूण ५१ अस्थायी पदांना दिनांक १.३.२०१८ पासून दिनांक ३०.९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मुदतवाढ-१०१७प्र.क्र.७७/र-१
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २२ मार्च, २०१८.

पहावे :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-२००८/प्र.क्र.४३२/र-१, दि.२८.१.२०१०.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, पदनि२०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. १०.२.२०१७.
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्रमांक उपआ/पुनर्व./उपले/का ७८/१७, दि. ४.१०.२०१७ चे पत्र
४) शासन निर्णय परिपत्रक क्र.पदनि -२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दि.१०.२.१७ व दि.३.१०.२०१७ चे पत्र
५) शासन निर्णय क्र.मुदतवाढ-१०१७/प्र.क्र.७७/र-१, दि.२३.३.२०१७ व दि.१८.१.२०१८
६) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्रमांक उपआ/पुनर्व/उपले/कावि-२०/१८, दि.१४.३.२०१८
७) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दि.५.३.२०१८

शासन निर्णय :-

अमरावती महसूली विभागातील विविध पाटबंधारे व अन्य प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामासाठी निर्माण करण्यात आलेल्या ५१ पदांना संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक ५ अन्वये दिनांक २८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

२. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार मदत व पुनर्वसन उपविभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय स्तरावरील पदांचा आढावा घेण्यात आला असून पुनर्वसन आस्थापनेवरील अमरावती विभागातील एकूण ५२ पदांचा आकृतीबंध संदर्भिय शासन निर्णय क्रमांक १ नुसार निश्चित केला आहे. त्यानुसार ५१ पदांना सोबतच्या **"अ" व "ब"** प्रपत्रात दर्शविल्यानुसार **दिनांक १.३.२०१८ ते ३०.९.२०१८** पर्यंत पुढे चालू ठेवण्यास याव्दारे शासनाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. विभागीय आयुक्त/जिल्हा स्तरावर उपआयुक्त (पुनर्वसन) यांना प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन भूसंपादन कायदा १८९४ कलम १८ व २८ अंतर्गत वाढीव मोबदला प्रकरणांना मंजूरीकरिता शासनास सादर करणे, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ कलम ११ (१), १३ (१), १३ (२) अंतर्गत अधिसूचना मंजूरी देणे, नवीन भूसंपादन कायदा २०१४ अंतर्गत पुनर्वसन कामाचा आढावा घेणे, तसेच कलम ११,१९ २३ व विभागीय स्तरावर कलम १८ अन्वये प्रकल्पग्रस्त पुनर्वसन योजना मंजूरी देणे,

नागरी सुविधांचे कामास प्रशासकीय मान्यता देणे, अनुदान वाटप करणे, इ. भूसंपादनाची कामे व नैसर्गिक आपत्ती संबंधिची कामे हाताळण्यात येतात.

४. उपरोक्त पदे अस्थायी स्वरुपाची असून ती पदे संबंधित विभागाच्या स्थायी पदांबरोबर अतिरिक्त पदे म्हणून मानण्यात यावीत. तसेच सदरहू पदांबरोबर पदधारक शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ते व इतर पुरक भत्ते मिळण्यास पात्र राहतील. तसेच उपरोक्त पदे सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त नव्हती. या धारणेच्या अधिन राहून मुदतवाढीस शासनाने मंजूरी दिली आहे.

५. सदरहू पदांपैकी आयुक्त कार्यालयातील पुनर्वसनासाठी मंजूर केलेल्या कर्मचारी वृदांचा खर्च मुख्य शिर्ष मागणी क्रमांक सी-५-२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-०१- प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन-(०३)पुनर्वसन (२०२) (०३) (०५), आयुक्त अमरावती, (२२३५ १९१५) (योजनेतर) या खाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ च्या मंजूर तरतूदी मधून भागविण्यात यावा.

६. पुनर्वसन व भूसंपादन आस्थापनेवरील जिल्हास्तरीय पदांवर होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष “मागणी क्रमांक सी-५-२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण(०१)राज्य योजनांतर्गत योजना, प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन -(०४) पुनर्वसन (२०२)(०४) (०५) आयुक्त अमरावती (२२३५ १९७१) (योजनांतर्गत)” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-२०१९ च्या मंजूर तरतूदीमधून तो भागविण्यात यावा.

७. प्रकल्पबाधिताच्या पुनर्वसन कार्यक्रमावर होणाऱ्या खर्चाच्या विभागणी बाबत संबंधित जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ यांनी संबंधित प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांशी विचारविनियम करुन २०१८-१९ वित्तीय खर्चाचा आवश्यक तो ताळमेळ घालून जुळवाजुळव करावी. तसेच इतर प्रकल्पाचे संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करुन सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचा खर्च समायोजित करावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२,दिनांक १७.४.२०१५ नुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग तीन मधील अ.क्र.४ चा परिच्छेद २७ (२) (क) अन्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/आ.पु.क,दिनांक ५.३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२७१२१९५८९०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46ec07554eac404147684ed8b27adc8a1c2a78fe8ffea3c9dd01377e25f76a36, cn=Shivaji P Karwar
Date: 2018.03.27 12:23:20 +05'30'

(शि.पां.कारवार)

कक्ष अधिकारी,महसूल व वन विभाग

प्रति,

१) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

२) उपआयुक्त, अमरावती (पुनर्वसन), अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.

३) जिल्हाधिकारी (पुनर्वसन शाखा), अमरावती/अकोला/बुलढाणा/ यवतमाळ.

४) महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (१) व (२), लेखा परिक्षा, मुंबई / नागपूर.

५) महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (१) व (२), लेखा व अनुज्ञेयेता, मुंबई / नागपूर.

६) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती/अकोला/बुलढाणा/ यवतमाळ.

७) कक्ष अधिकारी (मोप्र-२) जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.

८) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, आ.पु.क., मंत्रालय,मुंबई.

९) कार्यासन अधिकारी (र-८)/ महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.

१०)निवड नस्ती (र-१)

प्रपत्र-अ (शासन निर्णय क्रमांक मुदतवाढ-२०१७/प्र.क्र.७७/र-१, दि. २२.३.२०१८ सोबतचे सहपत्र)

अमरावती विभागातील जिल्हास्तरावरील भूसंपादन आस्थापनेवरील दिनांक १.३.२०१८ ते दिनांक ३०.९.२०१८ पर्यत मुदतवाढ दिलेल्या पदांचा तपशिल

अ.क्र.	जिल्हा जिल्हास्तरावरील कर्मचारी वृंद	अधिकारी कर्मचारी पदांची नावे	पदांची वेतनश्रेणी (असुधारीत)	पदांची संख्या
१	२	३	४	५
१	**अमरावती**	१)विशेष भुसंपादन अधिकारी (उपजिल्हाधिकार श्रेणी)	रु.१५६००-३९१०० जीपी-५४००	१
		२)अव्वल कारकून	रु.५२००-२०२०० जीपी-२८००	१
		३)लिपिक-टंकलेखक	रु.५२००-२०२००जीपी-१९००	१
		४) मंडळ निरिक्षक	रु.५२००-२०२०० जीपी-३५००	१
		५)तलाठी	रु.५२००-२०२०० जीपी-२४००	१
		६)शिपाई	रु.४४००-७४४० जीपी-१३००	१
		एकूण		**६**
२	**अकोला**	१)विशेष भुसंपादन अधिकारी (उप जिल्हाधिकारी श्रेणी)	रु.१५६००-३९१०० जीपी-५४००	१
		२)अव्वल कारकून	रु.५२००-२०२०० जीपी-२८००	१
		३)लिपिक-टंकलेखक	रु.५२००-२०२००जीपी-१९००	१
		४) मंडळ निरिक्षक	रु.५२००-२०२०० जीपी-३५००	१
		५)शिपाई	रु.४४००-७४४० जीपी-१३००	१
		एकूण		**५**
३	**यवतमाळ**	१)विशेष भुसंपादन अधिकारी (उप जिल्हाधिकारी श्रेणी)	रु.१५६००-३९१०० जीपी-५४००	१
		२)अव्वल कारकून	रु.५२००-२०२०० जीपी-२८००	१
		३)लिपिक-टंकलेखक	रु.५२००-२०२००जीपी-१९००	१
		४) मंडळ निरिक्षक	रु.५२००-२०२०० जीपी-३५००	१
		५)तलाठी	रु.५२००-२०२०० जीपी-२४००	१
		६)शिपाई	रु.४४००-७४४० जीपी-१३००	१
		एकूण		**६**
		सर्व एकूण		**१७**

प्रपत्र ब- (शासन निर्णय क्रमांक मुदतवाढ-२०१७/प्र.क्र. ७७/र-१, दि. २२.३.२०१८ सोबतचे सहपत्र)

अमरावती विभागातील विभागीय आयुक्त व जिल्हास्तरावरील पुनर्वसन दिनांक १.३.२०१८ ते दिनांक ३०.९.२०१८ पर्यत मुदतवाढ दिलेल्या पदांचा तपशिल

अ.क्र.	विभाग	कर्मचारीवृद पदांची नावे	पदांची वेतनश्रेणी (असुधारीत)	पदांची संख्या
१	२	३	४	५
१	**आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.**	१)उप आयुक्त (पुन.) (अप्पर जिल्हाधिकारी श्रेणी)	१५६००-३९१००जीपी-७६००	१
		२)अव्वल कारकून	५२००-२०२०० जीपी २८००	१
		३)उप लेखापाल	९३००-३४८०० जीपी ४२००	१
		५)लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		६)वाहन चालक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		७)शिपाई	४४००-७४४० जीपी १३००	१
			एकूण	**६**
		जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी		
१	**अमरावती**	१)जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उप जिल्हाधिकारी वेतनश्रेणी)	१५६००-३९१००जीपी-५४००	१
		२)उप लेखापाल	९३००-३४८०० जीपी ४२००	१
		३)मंडळ निरिक्षक	५२००-२०२०० जीपी ३५००	१
		४)अव्वल कारकून	५२००-२०२०० जीपी २८००	१
		५)तलाठी	५२००-२०००० जीपी २४००	१
		६)लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		७)भुमापक सर्वेअर	५२००-२०००० जीपी १९००	१
		८)शिपाई	४४००-७४४० जीपी १३००	१
			एकूण	**८**
२	**यवतमाळ**	१)जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उप जिल्हाधिकारी वेतनश्रेणी)	१५६००-३९१००जीपी-५४००	१
		२)अव्वल कारकून	५२००-२०२०० जीपी २८००	२
		३)लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		४)मंडळ निरिक्षक	५२००-२०२०० जीपी ३५००	१
		५)तलाठी	५२००-२०००० जीपी २४००	१
		६)भुमापक सर्वेअर	५२००-२०००० जीपी १९००	१
		७)वाहन चालक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		८)शिपाई	४४००-७४४० जीपी १३००	१
			एकूण	**९**
३	**अकोला**	१)जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उप जिल्हाधिकारी श्रेणी)	१५६००-३९१००जीपी-५४००	१

		२)लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		३)तलाठी	५२००-२०००० जीपी २४००	१
		४)शिपाई	४४००-७४४० जीपी १३००	१
		एकूण		**४**
४	**बुलढाणा**	१)जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उप जिल्हाधिकारी वेतनश्रेणी)	१५६००-३९१००जीपी-५४००	१
		२)अव्वल कारकून	५२००-२०२०० जीपी २८००	१
		३)लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		४)मंडळ निरिक्षक	५२००-२०२०० जीपी ३५००	१
		५)तलाठी	५२००-२०००० जीपी २४००	१
		६)वाहन चालक	५२००-२०२०० जीपी १९००	१
		७)शिपाई	४४००-७४४० जीपी १३००	१
		एकूण		**७**
		सर्व एकूण		**३४**